REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2021

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चा इतिहास (१९५६ ते १९६०)

**Deepak Bhika Ghodeswar**
M.Phil Student, Depa rtament of History,
University of Mumbai.

## प्रस्तावना :




१४ एप्रिल, १८९१ साली मध्यप्रदेश येथील महू या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत त्यांनी उच्च शिक्षण घेतले. हजारो वर्षांपासून अस्तित्वात असणाऱ्या जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था विरुद्ध त्यांनी लढा दिला. भारतातील अस्पृश्य जातीच्या, शूद्र-अतिशूद्र, वंचित, दलित घटकांना वर्णव्यवस्था आणि जाती व्यवस्था तसेच, ब्राम्हणवादाच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी, त्याचबरोबर माणसाला माणूस म्हणून जागता यावे यासाठी संघर्ष केला. या संघर्षासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारणी सभा, समता सैनिक दल, समाज समता मंच, पीपल्स एज्यूकेशन सोसायटी, बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, स्वंतत्र मजदूर पक्ष व शेड्ुल कास्ट फेडरेशन या संघटना स्थापन केल्या. तसेच, या संघटनांच्या माध्यमातून मागासवर्गीय समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर, १९५६ साली आपल्या लाखो अनूयायांसोबत बौध्द धर्म स्वीकारला. संविधानाच्या माध्यमातून लोकशाहीला सहाय्यक अश्या स्वतंत्र, समता, बंधुता, न्याय या मुल्यांवर आधारित रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षाच्या स्थापनेचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडला. परंतु, खालावलेल्या प्रकृतीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर, १९५६ रोजी महपरिनिर्वाण झाले. त्यामुळे, पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष त्यांच्या अनुयायांनी ३ ऑक्टोबर, १९५७ रोजी स्थापन केला.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाने १९५७, च्या निवडणुकीत यश मिळवून संसदेत अस्पृश्य, शूद्र-अतिशुद्र, कामगार, शेतकरी, महिला व जनतेच्या हिताचे प्रश्न मांडले. परंतु, पुढे मतभेद व आपापसातील हेवे- दावे यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे विघटन होऊन गट-तट निर्माण झाले.

## उदिष्टे:

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वणा नंतर स्थापन झालेल्या "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" या पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडणे.
2) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चा आढावा घेणे.
3) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाच्या कार्यावर प्रकाश टाकणे.
4) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या विघटनाचा विष्लेशनात्मक आणि तुलनात्मक अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती :

ऐतिहासिक वर्णात्मक पद्धतीचा अभ्यास करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चा इतिहास मांडण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांच्या वाचनातून त्यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाच्या स्थापनेची संकल्पना सांगण्यात आली आहे. तसेच, सूक्ष्म अध्ययन पद्धतीचा वापर करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या उदयाची व विघटनाची कारणे सांगण्यात आली आहे.

## रिपब्लिकनपार्टी ऑफ इंडिया या पक्षाची ऐतिहासिकपार्श्वभूमी :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक जिल्ह्यातील येवला या ठिकाणी १३ ऑक्टोबर, १९३५ साली सभेत "मी हिंदू म्हणून जन्माला आलो ते माझ्या हातात नव्हते, पण मी हिंदू म्हणून मरणार नाही" असे जाहीर केले. त्यानंतर त्यांनी अनेक धर्मांचे अध्ययन केले, जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी धार्मिक ग्रंथांचा सखोल अभ्यास करून १९४८, साली " The Uht ochabl e" हा ग्रंथ लिहीला. २० ऑगस्ट, १९५५ ला जनता या पाक्षिकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्ही बौध्द धम्म स्वीकारणार अश्या स्वरूपाचे निवेदन प्रसिद्ध केले. पुढे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर, १९५६ ला नागपुर या ठिकाणी आपल्या लाखो अनूयायांसोबत बौध्द धर्म स्वीकारला.

बौध्द धर्म स्वीकारल्यानंतर, शेड्डुल कास्ट फेडरेशन या राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करता येणार नाही. तसेच, शेड्डुल कास्ट फेडरेशन हा जाती दर्शक पक्ष आता ठेवून चालणार नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते. म्हणून, सर्व समजाचे प्रतिनिधित्व करणारा सर्व समावेशक अश्या नव्या राजकीय पक्षाच्या स्थापनेचा मनसुबा व त्या संदर्भात तश्या सूचना व आशावादी विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "जनता" या पाक्षिकात १० डिसेंबर, १९५५ साली प्रसिध्द केला.[1] अस्पृश्यांच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय न्याय हक्कांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे बौध्द धम्म स्वीकारला व त्यामुळे पुढे त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा राजकीय पक्ष स्थापन करण्याचा विचार केला.

## रिपब्लिकनपार्टी ऑफ इंडिया चा उदय :

२६ जानेवारी, १९५० पासून स्वतंत्र भारतात राज्यघटना अंमलात आली. तसेच, १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका होऊन शेड्डुल कास्ट फेडरेशन या पक्षाला अपयश आले. त्यामुळे, पुढे राजकरणात सत्ता मिळवण्यासाठी सम विचारी पक्षांसोबत जावे लागणार, असा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बनवला. त्याकरिता त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समिति ला सहकार्य देवून महाराष्ट्रात कॉंग्रेसच्या विरोधात शक्ति निर्माण केली.[2] १९५२ मध्ये शेड्डुल कास्ट फेडरेशनला मिळलेल्या अपयशामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नवीन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय केला. तसेच, त्यांनी त्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीला पाठिंबा देण्याचा निर्णय देखील केला.

वाढत्या वयानुसार व शारीरिक आजारपणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रकृती खालावत चालली होती. डिसेंबर, १९५६ साली औरंगाबाद येथे वास्तव्यात असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नावाचा नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्याच्या विचारात आहे. हा राजकीय पक्ष समता, स्वतंत्र, बंधुता, न्याय या तत्वांचा पुरस्कार करणारा व भारतीय संविधानाला अभिप्रेत कार्य करणारा असेल असा विचार त्यांनी व्यक्त केला. याशिवाय भारतातील कॉंग्रेस सारख्या पक्षाला विरोध करण्यासाठी रिपब्लिकन पक्ष कार्य करील असे त्यांनी प्रतिपादन केले होते. कॉंग्रेस विरोधी व इतर सम विचारी पक्षांसोबत युती करण्याची तयारी त्यांनी दर्शवली त्यानुसार, डॉ. राममनोहर लोहिया यांच्याशी पत्र व्यवहारमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा उलेख केला.[3] कॉंग्रेस हा विरोधी पक्ष असल्याकारणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय पातळीवर सम विचारी पक्षांना एकत्र करून एकजूट निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार त्यांच्या नवी दिल्ली येथील निवासस्थानी त्यांच्या अध्यक्षतेखाली ३० सप्टेंबर, १९५६ साली शेड्डुल कास्ट फेडरेशन ची राष्ट्रीय बैठक घेण्यात आली. त्यात सर्वानुमते अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या राष्ट्रीय बैठकीच्या निर्णयाची बातमी प्रबुध्द भारत या पाक्षिकात

दि. ६ व १३ ऑक्टोबर, १९५६ च्या अंकात छापून आली होती. परंतु, डॉ. बाबासाहेब ६ डिसेंबर, १९५६ रोजी महपरिनिर्वाण झाले.[4] त्यामुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विचार केलेल्या रिपब्लिकन पक्ष स्थापनेचे काम त्यांच्या मृत्यूमुळे स्थगित झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मृत्यूमुळे स्थगित झालेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या स्थापनेसाठी त्यांच्या अनुयायांनी २१ एप्रिल, १९५७ रोजी नागपुर येथे सर्वानुमते बैठक घेतली. बैठकीच्या निष्कर्षातून अनुयायांनी ३ ऑक्टोबर, १९५७ रोजी नागपुर येथे शेडुल कास्ट फेडरेशन हा पक्ष विसर्जित केला आणि रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्यात आला. या नवोदित रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रा. ब. एन. शिवराज होते, तर कार्यवाहक म्हणून राजाभाऊ खोब्रगडे यांना नेमण्यात आले होते.[5] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर त्यांच्या विश्वसनिय सहकारी आणि अनुयायांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची स्थापना केली. आणि स्थगित झालेल्या पक्षाच्या कार्याला पुन्हा एकदा नव्याने चालना दिली.

## रिपब्लिकनपार्टी ऑफ इंडिया पक्षाची कामे आणि कार्य :

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची ध्येय उदीष्टे न्याय, स्वतंत्र, बंधुता, समता अशा भारतीय राज्यघटनेच्या मूल्यांना जोपासणारी होती. तसेच, जनतेच्या धार्मिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक अधिकार, यांना अबाधित ठेवण्यासाठी काम करणारी होती. लोकांच्या, अस्पृश्यता, पिळवणूक, वेठबिगारी, दडपशाही यांना रोखण्याचे काम पक्ष करेल, असा जाहीरनामा पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रचारीत केला होता.[6] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची ध्येय- उदीष्टे भारतीय संविधनाला अनुसरुन तयार केलेली होती. त्यामुळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या उदीष्टांना समोर ठेवून कार्य सुरू केले.

पक्षाचे काम सुरू झाल्यानंतर १९५७ ला निवडणुक झाल्या. या निवडणुकी मध्ये रिपब्लिकन पार्टी चे ९ खासदार, १९ आमदार निवडून आले होते. त्यात पंजाब चे ५, म्हैसूर चे २, आंध्र प्रदेशातून १, गुजरात मधून २, मद्रास प्रांताचे २९ आमदार निवडून आले होते.[7] १९५७ च्या निवडणुकीत पक्षाच्या निवडून आलेल्या खासदर व आमदारांमुळे पक्षाला फार मोठे यश प्राप्त झाले होते. त्यामुळे, १९५७ च्या निवडणुकी नंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ने महत्वपूर्ण काम हाती घ्यायला सुरुवात केली.

भुमूहिनांचा सत्याग्रह बऱ्याच वर्ष लढवून भुमूहिनांना न्याय देणे, पूर्वीचे महार यांना सवलती देणे, अस्पृश्य दलित यांच्या वरील हल्याची चौकशी करणे, दीक्षाभूमी ला स्मारक बांधणे, बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी राष्ट्रीय सुट्टी देणे, कनिष्ठ गाव कामगार व मजदूरांचे प्रश्न, यांच्यासाठी वेळोवेळी रिपब्लिकन पार्टी ने आंदोलने केले. २ ऑक्टोबर, १९५७ ला रिपब्लिकन पार्टी ची सभा पार पडली त्यात दादासाहेब गायकवाड यांनी गाव कामगार यांच्या पक्षाकडे लक्ष वेधले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे संसदेत निवडून गेलेले खासदार बी. सी. कांबळे यांनी ९ डिसेंबर, १९५७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मृत्युच्या चौकशी अहवाल सादर करण्याची मागणी केली. त्याचबरोबर, नवबौद्धांना सवलती, राखीव जागा हक्क दयावेत अशी भूमिका घेतली. २८ ते ३० डिसेंबर, १९५७ साली अकोलामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक पक्षाच्या वतीने उभारावे असे ठराव झाले. मार्च, १९५८ मध्ये खासदार जी. के. माने यांनी कोकण रेल्वेची काम सुरू करावे अशी मागणी केली. तर राजाभाऊ खोब्रागडे यांनी आर्थिक प्रगतीसाठी दलितांना पडीक जमिनी वाटण्याची मागणी केली. १९ मार्च, १९५९ रोजी लोकसभेत उपस्थित असलेल्या दादासाहेब गायकवाड यांनी अस्पृश्यांवर होणारे अन्याय-अत्याचार, पोलीसांची पक्षपाती भूमिका, शेतीसाठी दलितांना जागा, उद्योगात सवलती, सरकारी नोकरी, घरगुती उद्योगाला अनुदान ईत्यादी मागण्या केल्या.[8] संसदेत निवडून गेलेल्या रिपब्लिकन नेत्यांनी जनतेचे मूलभूत प्रश्न संसदेत मांडले. जनतेसाठी विविध मागण्या आणि अन्याय अत्याचाला विरुध्द वाचा फोडली.

१९५९ मध्ये सरकार कडील पडिक जमीन भूमीहीनांना द्यावी याकरिता मराठवाड्यात दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. त्यांना चार महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा झाली. परंतु, नाशिकचे रमाबाई आंबेडकर वस्तीगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर वसाहत तसेच, रमाबाई आंबेडकर सभागृह ही दादासाहेब गायकवाड यांच्या कार्यामुळे निर्माण झाले.[9] रिपब्लिकन नेत्यांनी आपली भूमिका बजावून जनतेला त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले आणि यश देखील मिळवले.

भारत सरकारने काही मान्यवर राजनेत्यांचे पोस्टाचे टिकटे प्रसारित करण्याचे ठरवले, त्यात भारतीय संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव नव्हते म्हणून रिपब्लिकन नेत्यांनी विरोध दर्शवला. त्यामुळे, १४ एप्रिल, १९६५ ला भारत सरकार ने तिकीट जारी केले. १९६६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म दिनाला पंचहत्तर वर्ष पूर्ण होण्याचे निमीत्ताने चैत्यभूमी येथे यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत दादासाहेब गायकवाड यांनी भिमज्योत सोहळा पार पाडला.[10] २६ मार्च,१९६८ साली भैय्यासाहेब आंबेडकर यांनी महु येथून जगजीवनराम यांच्या हस्ते भिमज्योत प्रोजोलीत करून १४ एप्रिल, १९६९ रोजी मुंबई पर्यंत आपल्या अनुयांसोबत प्रवास केला. भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या पुढाकारानेच जनतेच्या वर्गणीतून पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभे केले.[11] अशाप्रकारे, रिपब्लिकन पार्टी इंडिया च्या नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला सलामी देत सर्व जगासमोर त्यांच्या कर्तुत्वाची झळाळी येण्यासाठी काम केले.

## रिपब्लिकनपार्टी ऑफ इंडिया चे विघटन :

पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल नेहमीच म्हणत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संघटना ही पोलादी संघटना आहे जी कधीही विघटित होऊ शकत नाही. पण, रिपब्लिकन नेत्याच्या वृतीमुळे ते शक्य होऊ शकले नाही. महाराष्ट्र कॉंग्रेस नेते यशवंतराव चव्हाण हे बेरजेचे राजकारण करण्यात निपुण होते. रिपब्लिकन पक्ष संपवण्यासाठी कॉंग्रेस चाणक्यनीतीचा वापर करत होता. त्यामुळे, पुढील काळात रिपब्लिकन नेत्यात मोठ्याप्रमाणात फुट पडून कॉंग्रेस पक्ष्यात ते सामील झाले.[12] कॉंग्रेस पक्षाच्या राजकारणामुळे रिपब्लिकन पक्ष्यामध्ये गट-तट निर्माण झाले.

१९६२ च्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली. पण, पक्षाच्या स्थापनेनंतर काही वर्षातच रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांमध्ये हेवे दावे निर्माण होऊ लागले. त्यामुळे, १९६२ मध्ये पक्ष फुटीला सुरुवात झाली आणि रिपब्लिकन पार्टी गट-तट मध्ये विभागली गेली. बी. सी. कांबळे गट रिपब्लिकन एकयापासून दूर जाऊन, आर. डी. भांडारे कॉंग्रेस मध्ये गेले. तसेच, दादासाहेब गायकवाड यांनी कोंग्रेस चा हात पकडला, दादासाहेब रूपवते कॉंग्रेस मध्ये गेले.[13] गांधीजींना मुंबईत काळे झेंडे दाखवणारे रा.धो. भंडारे ३० जुन, १९६५ ला कॉंग्रेसच्या यशवंतराव चव्हाण यांच्या गटात सामील झाले. [14] अश्याप्रकारे, रिपब्लिकन पार्टी च्या नेत्यांमध्ये फाटा फुट होऊन पक्षाचे विघटन होऊ लागले. तेव्हा पासून रिपब्लिकन पक्ष ढासळायला सुरवात झाली. त्यामुळे, पक्षाची व नेत्यांची ताकत कमी झाली.

## सारांश :

डिसेंबर, १९५६ साली औरंगाबाद येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नावाचा नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्याचा विचार आपल्या अनुयायांसमोर सांगितला होता. परंतु, ६ डिसेंबर, १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरीनिर्वाण झाले. त्यामुळे, त्यांनी विचार केलेला राजकीय पक्षाला स्थगिती आली. त्यांच्या अनुयायांनी २१ एप्रिल, १९५७ रोजी बैठक घेतली. या बैठकीच्या निर्णयातून ३ ऑक्टोबर, १९५७ रोजी नागपुर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष स्थापन केला. या पक्षाची ध्येय उधिष्टे भारतीय संविधानाला शोभणारी होती. या पक्षामध्ये कार्यरत असलेले नेते बी. सी. कांबळे, राजाभाऊ खोब्रागडे, दादासाहेब गायकवाड यांनी संसदेत काम करत असताना जनतेच्या विविध मागण्या संसदेपुढे मांडले.

परंतु, कॉंग्रेस पक्षाच्या राजकारणामुळे १९६२ मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या नेत्यामध्ये हेवे- दावे निर्माण होऊन फुट पडली. त्यामुळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष गटातटात विभागून ऱ्हासाकडे वाटचाल करू लागला.

## संदर्भ सूची :

1. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२९ ते १९५६,* डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड २०, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रे साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती, २००५.
2. मेणसे कृष्णा, *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी,* न्यू एनीज प्रिंटिंग प्रेस भुपेश गुप्ता भवन, मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर, २००९

3. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२९ ते १९५६,* डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड २०, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रे साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती, २००५.
4. वाघ संदेश, *आंबेडकरी चळवळीचा इतिहास,* संदेश पब्लिकेशन, आवृत्ती- ६, मुंबई, डिसेंबर, २०१२.
5. पवार ज. वी. *आंबडेकरोत्तर अंबडेकरी चळवळ, खंड तिसरा,* १९६५ ते १९७१ अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, ६ डिसेंबर, २००७
6. फडकुले निर्मलकुमार, *कर्मवीर दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तुत्व,* संपादक मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१०
7. ढसाळ नामदेव, *दलित पॅंथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४,

---

[1] *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२९ ते १९५६,* डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड २०, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रे साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती-२००५, पान क्र -४३७,

[2] श्री. कृष्णा मेणसे, *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी,* न्यू एज प्रिंटिंग प्रेस भुपेश गुप्ता भवन. मुंबई, नोव्हेंबर २०१९, पान.४२,

[3] *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२९ ते १९५६,* डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड २०, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रे साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती-२००५, पान क्रं -४३९

[4] किता पान क्रं - ४३८

[5] डॉ. संदेश वाघ, *आंबेडकरी चळवळीचा इतिहास,* संदेश पब्लिकेशन, आवृत्ती- ६ डिसेंबर, २०१२ मुंबई, पानं क्रं- १७४

[6] *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२९ ते १९५६,* डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड २०, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रे साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती-२००५, पान क्रं- ४५९

[7] ज.वी. पवार, *आंबडेकरोत्तर आंबडेकरी चळवळ,* खंड तिसरा, १९६५- १९७१ अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, ६ डिसेंबर, २००७, पान क्रं – ३७,

[8] डॉ. संदेश वाघ, *आंबेडकरी चळवळीचा इतिहास,* संदेश पब्लिकेशन, आवृत्ती- ६ डिसेंबर, २०१२ मुंबई, पानं क्रं- १७७, १७८

[9] डॉ. निर्मलकुमार फडकुले, *कर्मवीर दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तुत्व,* संपादक मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळं, मुंबई, २०१० पानं- १४५, २१७

[10] ज.वी. पवार, *आंबडेकरोत्तर आंबडेकरी चळवळ,* खंड तिसरा, १९६५- १९७१ अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, ६ डिसेंबर, २००७पान क्रं – ३५

[11] नामदेव ढसाळ, *दलित पॅंथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४, पान क्रं- ४९

[12] श्री. कृष्णा मेणसे, *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी,* न्यू एज प्रिंटिंग प्रेस भुपेश गुप्ता भवन, मुंबई,नोव्हेंबर २०१९, पान क्रं- ४३,

[13] ज.वी. पवार, *आंबडेकरोत्तर आंबडेकरी चळवळ,* खंड तिसरा, १९६५- १९७१ अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, ६ डिसेंबर, २००७ पान क्र – १९

[14] नामदेव ढसाळ, *दलित पॅंथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४, पान क्रं – ५५